# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### विदर्भ, मराठवाडा, वाडा व पालघर येथील उद्योगांना विजेच्या दरात अनुदान मिळण्याबाबत

**(१) १३०३ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विजेच्या वाढत्या दरामुळे विदर्भ, मराठवाडा, वाडा व पालघर वगळता उत्तर महाराष्ट्र, कोल्हापूरसह उर्वरित महाराष्ट्रातील वाणिज्यिक उद्योग मेटाकुटीला आले असून या विभागातील उद्योगधंदे आर्थिक मंदीमुळे संकटात सापडले असल्याने विदर्भ, मराठवाडा, वाडा व पालघर येथील उद्योगांना दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या धर्तीवर उत्तर महाराष्ट्र, कोल्हापूरसह उर्वरित महाराष्ट्रातील वाणिज्यिक उद्योगांनाही विजेच्या दरात अनुदान देण्यात यावे अशी मागणी दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा, वाडा व पालघर येथील उद्योगांना देण्यात येत असलेल्या सवलतीच्या धर्तीवर उर्वरित महाराष्ट्रातील वाणिज्यिक उद्योगांना विजेच्या दरात अनुदान देण्याबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) उद्योग, उप मुख्यव कामगार विभागाच्या दिनांक २४/०६/२०२१ च्या शासन निर्णयान्वये शासनाने एक अभ्यासगट स्थापन केला आहे. सदर अभ्यास गटाचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील मत्स्योत्पादनात होणारी घट रोखण्याबाबत

**(२) ६००२ (१३-१२-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मत्स्योत्पादनात गेल्या अनेक वर्षांपासून चिंताजनक अशी घट झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असून यावर उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या डॉ.सोमवंशी समितीने किनारपट्टी भागास भेट देऊन संपूर्ण माहिती मिळवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालावर निर्णय घेण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने राज्यात मत्स्योत्पादनात होणारी घट रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्याच्या मत्स्योत्पादनातील होणारी घट यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सोमवंशी समिती स्थापन केली नसून पर्ससीन नेट पध्दतीने होणाऱ्या मासेमारीबाबत अभ्यास करण्यासाठी डॉ सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती.
(२) व (३) समितीने शासनास सादर केलेल्या अहवालानुसार खालील अधिसूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(अ) पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यासाठी दिनांक ०५/०२/२०१६ ची अधिसूचना
(आ) ट्रालिंग मासेमारीचे नियमन करण्यासाठी दिनांक ०८/०२/२०१६ ची अधिसूचना
(इ) एल.ई.डी/दिव्यांना प्रतिबंध करण्यासाठी दिनांक २७/०४/२०१८ ची अधिसूचना
(ई) ट्रॉल जाळीचा खोलाचा भाग ४० मि.मी. करण्याबाबत दिनांक १०/०१/२०१७ ची अधिसूचना

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना महामारीच्या काळात न्यायालयाच्या निर्देशानुसार शासकीय व जिल्हा रूग्णालयात रूग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(३) ८४७१ (२२-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना महामारीच्या काळात शासकीय व जिल्हा रूग्णालयात रूग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची व्यवस्था करण्याचे न्यायालयाने निर्देश दिले असतानाही नागपूर शहरातील एकाही रूग्णालयात दिलेल्या निर्देशानुसार व्यवस्था करण्यात आलेली नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने न्यायालयाच्या निर्देशानुसार शासकीय व जिल्हा रूग्णालयात रूग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२६-०७-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर स्थित अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) ला वीज पुरवण्यासाठी महावितरणने केलेली मागणी रद्द होण्याबाबत

**(४) ८८९६ (०९-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर स्थित अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) ला वीज पुरवण्यासाठी महावितरणने सुरक्षा ठेवींसह इतर खर्च व शुल्क असे एकूण १३ कोटी ९४ लाख ७४ हजार रुपये भरण्याची सूचना केल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयासोबत महाराष्ट्र शासनाच्या तत्कालीन वैद्यकीय शिक्षण खात्याच्या सचिवांनी केलेल्या करारानुसार रस्ते, पाणी, वीज यासह पायाभूत सुविधा राज्य शासनाकडून देण्याचे स्पष्ट असतानाही याकडे दुर्लक्ष करून जाणीवपूर्वक विजेकरीता १४ कोटी रुपये भरण्याची सूचना शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५ च्या करारानुसार ही सूचना रद्द होणेकामी नागपूर येथील लोकप्रतिनिधी तसेच नागपूर एम्सचे संचालक यांनी शासनाकडे वेळोवेळी लेखी निवेदनाद्वारे विचारणा केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने नागपूर स्थित अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) ला वीज पुरवण्यासाठी महावितरणने केलेली मागणी रद्द होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२२) :** (१) हे खरे आहे.

एम्स ला ३३ के.व्ही. स्वतंत्र वीज वाहिनीव्दारे वीज पुरवठ्याच्या रुपये १३,९४,७४,५३७ इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास महावितरणव्दारे दिनांक २६/०२/२०२० ला मंजूरी दिली आहे. तसेच महापारेषण कंपनीने दिनांक ०७/०९/२०२० च्या पत्रान्वये ३३ के. व्ही. उभारणीच्या रुपये ४६,८५,०५० इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मंजूरी दिली आहे.

(२) हे खरे नाही.

अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) नागपूर यांच्या मागणीप्रमाणे मा.विद्युत नियामक आयोगाच्या, विनियमानुसार नवीन वीज पुरवठ्याकरीता एकूण रुपये १४,४१,५९,५८७/- चे मागणीपत्र देण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) नागपूर यांनी महापारेषण कंपनीच्या मागणीपत्रानुसार रुपये ४६,८५,०५० इतकी रक्कम महापारेषण, नागपूर मंडळ यांच्याकडे दिनांक २९/११/२०२१ रोजी भरली आहे. तसेच महावितरण कंपनीच्या मागणीपत्रानुसार रुपये १३,९४,७४,५३७/- इतकी रक्कम महावितरण, नागपूर मंडळ यांच्याकडे दिनांक १४/१२/२०२१ रोजी भरली आहे. त्या अनुषंगाने महापारेषण व महावितरणव्दारा पुढील कार्यवाहीचे नियोजन सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चोरी गेलेल्या वाहनांचा शोध घेण्याबाबत

**(५) ९९८५ (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत दोन महिन्यात ५७३ वाहनांची चोरी झाल्याचे दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चोरीला गेलेल्या वाहनांपैकी ५३ वाहनांचा शोध लागला असून उर्वरित वाहनांचा शोध लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चोरी गेलेल्या वाहनांचा शोध घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०२२) :** (१) होय.
(२) नाही.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तलयाच्या कार्यक्षेत्रात माहे जानेवारी, २०२१ ते मार्च, २०२१ या कालावधीत मोटार वाहन चोरीच्या नोंद गुन्हयाची व शोध लागलेल्या वाहनांची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे-

| मोटार वाहन चोरी | | | | |
|---|---|---|---|---|
| माहे | दाखल | उघड | चोरीस गेलेली एकूण वाहने | मिळून आलेली एकूण वाहने |
| जाने. २०२१ | ३२५ | ५९ | ३२५ | ६५ |
| फेब्रु. २०२१ | २४८ | ५० | २४८ | १०५ |
| मार्च २०२१ | ३२९ | ७८ | ३२९ | १४० |

(३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील विविध पोलीस ठाण्यातून चोरी गेलेल्या वाहनांचा शोध घेण्याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना :-

- चोरी गेलेल्या वाहनांची माहिती बिनतारी संदेशाद्वारे प्रसारित करण्यात येते.
- वाहन ज्या ठिकाणाहून चोरीस गेले आहे अशा ठिकाणचे सर्व सीसीटिव्ही कॅमेरे तपासले जातात.
- चोरीस गेलेल्या वाहनाची माहिती आर.टी.ओ. कार्यालयास कळविण्यात येते.

- पोलीस ठाणे हद्दीतील बनावट चावी बनविणारे यांच्याकडे तपासणी करण्यात येते. वाहनांचे सुट्टे भाग विकणारे व भंगाराचे वाहन घेणारे यांच्याकडे चौकशी करण्यात येते.
- पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदी व कोंबिग ऑपरेशन तसेच एम.व्ही.सीझर याचे वेळोवेळी आयोजन करण्यात येवून वाहनांची तसेच संशयीत इसमांची तपासणी केली जाते.
- शहरातील गर्दीच्या ठिकाणांजवळील पार्कींग, ब्रीज खालील पार्कींग, मॉल, बिजनेस पार्क इत्यादी ठिकाणच्या पार्किंग मध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार हे गस्तीच्या दरम्यान वाहनांची तपासणी करतात.
- बृहन्मुंबई महानगर पालिका डंपिंग यार्ड येथे बेवारस ताब्यात घेतलेल्या वाहनांची तपासणी केली जाते.
- सर्व पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे प्रकटीकरण पथक व विशेष पथकाकडून रात्रीच्या वेळी पोलीस ठाणे हद्दीतील निर्जन ठिकाणे, गर्दीची ठिकाणे व संशयीत ठिकाणी गस्त करुन तपासणी केली जाते. तसेच, बृहन्मुंबईच्या चेक नाक्यांवर मुंबई आत बाहेर जाणाऱ्या वाहनांचीही तपासणी केली जाते.
- मोटार वाहन चोरी करणाऱ्या अभिलेखावरील गुन्हेगारांची तसेच संशयीत गुन्हेगार यांची राहती निवासस्थाने, छुप्पे अड्डे यांची नियमित तपासणी करुन चोरी गेलेल्या मोटर वाहनांचा शोध घेण्याबाबत सातत्याने प्रयत्न करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ. लहाने यांच्यासह सेवानिवृत्त झालेल्या वैद्यकीय शिक्षण विभागातील डॉक्टरांना निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत

**(६) १०७१९ (०६-०१-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात दोन वर्षे दिवस-रात्र काम करणाऱ्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. तात्याराव लहाने यांच्यासह राज्यातील शेकडो डॉक्टरांना सेवानिवृत्तीनंतर पेन्शनपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ. लहाने यांना पद्मश्री मिळाल्यानंतर तत्कालीन मंत्री व विद्यमान मा.गृह मंत्री यांनी त्यांना तीन विशेष वेतनवाढ जाहीर केली असून ती त्यांना दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ. लहाने यांच्यासह सेवानिवृत्त झालेल्या वैद्यकीय शिक्षण विभागातील डॉक्टरांना पेन्शन लागू न होणाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेवानिवृत्त डॉक्टरांना विनाविलंब निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०३-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) यासंदर्भात कोणतेही आदेश निर्गमित झाल्याचे दिसून येत नाही.
(३) सेवानिवृत्त अध्यापकांचे सेवापुस्तक वेतन पडताळणी पथकाकडे सादर केले असता, आगाऊ वेतनवाढीच्या अनुषंगाने वेतन पडताळणी पथकाने आक्षेप उपस्थित केले असल्याने संबंधित अध्यापकांना नियमित निवृत्तीवेतन लागू करण्यास विलंब होत आहे.
(४) व (५) सेवानिवृत्त अध्यापकांना निवृत्तीवेतन मंजूरी संदर्भात वेतन पडताळणी पथकाने घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १९/०१/२०२२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे आयुक्त (वै.शि.), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यात आले आहे.

---

## राज्य शासनाच्या महसूल विभागातील नायब तहसिलदार/तहसिलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करतांना पदोन्नतीपासून वंचित राहिलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याबाबत

**(७) ११८८२ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी सन १९९९ ते सन २०११ या कालावधीत महसूल अर्हता परीक्षा आयोजित करण्यात आली नसल्याने त्यांना या परिक्षेतून उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याबाबतचा अहवाल शासनाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी मागविला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा अहवाल ९ महिने होऊनही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून शासनास प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यास्तरावरील अव्वल कारकून संवर्ग ज्येष्ठता यादी सूचित अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयातील २१ कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू २१ कर्मचारी सन २०१४ ते आजतागायत अव्वल कारकून ते नायब तहसिलदार, तसेच नायब तहसिलदार ते तहसिलदार या पदावर पदोन्नतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य स्तरावर नायब तहसिलदार/तहसिलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करताना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयातील गत ८ वर्षापासून पदोन्नतीपासून वंचित राहिलेल्या २१ कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक ०७/१२/२०२१ रोजीच्या पत्राद्वारे सदरचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.
(३), (४) व (५) विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयातील ज्या लिपिकांना सन १९९९ ते २०११ या कालावधीत अव्वल कारकून या पदावरील पदोन्नतीकरीता घेण्यात येणारी महसूल अर्हता परीक्षा देण्याची संधी प्राप्त झाली नाही, अशा कर्मचाऱ्यांना महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत असून तपासणीअंती प्रस्तुत प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपंचायत व नगरपालिका क्षेत्रात हाताने मैला साफ करण्याची पध्दत कायमस्वरुपी बंद करण्याबाबत

**(८) १३३१० (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक महानगरपालिका, नगरपंचायत व नगरपालिका क्षेत्रात हाताने मैला साफ करण्याची पध्दत अजूनही अवलंबिली जात असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपंचायत व नगरपालिका क्षेत्रात हाताने मैला साफ करण्याची पध्दत कायमस्वरुपी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ ची काटेकोर अंमलबजावणी करणे तसेच सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने दिनांक ३०/१/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनामार्फत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
तसेच शहरातील भूयारी गटारांची स्वच्छता यांत्रिकी पध्दतीने करण्याच्या सूचना दिनांक २१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला या विद्यापीठास नियमित शासकीय अनुदान मिळणेबाबत

**(९) १३५९८ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला या विद्यापीठास शासनाकडून मिळणारे अनुदान कमी प्रमाणात दिले जात असून ते वेळेवर ही दिले जात नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान वेळेवर मिळत नसल्याने व कमी प्रमाणात मिळत असल्याने तेथील अधिकारी, कर्मचारी, शास्त्रज्ञ, प्राध्यापक यांना दोन - दोन महिने वेतन प्राप्त होत नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विदर्भातील अकरा जिल्हयांचे कार्यक्षेत्र असलेल्या उक्त विद्यापिठास नियमानुसार नियमित अनुदान प्राप्त करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (२२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांना अनिवार्य खर्चातंर्गत वेतन व निवृत्तीवेतनविषयक खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीएवढा तसेच पुनर्विनियोजनाद्वारे कृषी विद्यापीठाच्या मागणीप्रमाणे अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली-मिरज शहरासह जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यामुळे गुन्हेगारीत वाढ होत असल्याबाबत

**(१०) १३७०४ (२३-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज शहरासह जिल्ह्यात सुरु असलेल्या व्हिडिओ गेम, जुगाराचे अड्डे, कसीनो, क्रिकेट बेटिंग अवैध दारू विक्री, वरली मटका, अश्या अनेक कारणामुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी वाढत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुपवाड (ता.मिरज, जि.सांगली) येथे एका व्हिडिओ गेम चालकाचा चाकूने वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना माहे मे, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यात जिल्हा पोलीस प्रशासनाला अपयश येत असल्याची शंका नागरिकांमध्ये निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सांगली जिल्ह्यातील अवैध धंदे हे पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच अवैध धंदे संगनमताने चालविण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

कुपवाड येथील व्हिडिओ गेम चालकाची आरोपीने पैशांच्या व्यवहारातून दिनांक १८/०५/२०२२ रोजी हत्या केली आहे. सदर प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाणे, सांगली येथे गु.र.नं.१४८/२०२२, भा.दं.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) सांगली पोलीस घटकांकडून अवैध धंद्यांवर नियमितपणे कारवाई करण्यात येत आहे. अवैध धंदे पोलीसांच्या संगनमताने सुरु असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. अवैध धंदे व गुन्हेगारी रोखण्याबाबत नियमित पेट्रोलिंग व नाकाबंदी सारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(६) विलंब झालेला नाही.

---

## सांगली वन विभागाचे उपवनसंरक्षक यांनी एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्याच्या होत असलेल्या मागणीबाबत

**(११) १३७०७ (२३-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली वन विभागाचे उपवनसंरक्षक यांनी एका महिलेचा विनयभंग केल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पीडित महिलेने सांगली वन विभागाचे उपवनसंरक्षक यांचे विरोधात कुपवाडा पोलीस प्रशासनाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी उपवनसंरक्षकास अटक करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी दिनांक ०६/०५/२०२२ रोजी एमआयडीसी कुपवाड पोलीस ठाणे, सांगली येथे गु.र.नं. १२८/२०२२ भा.दं.वि कलम ३५४, ३५४(अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणात तपासाअंती मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण मुंबईच्या समुद्रात असलेली दोन तरंगती रेस्टाँरन्ट पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१२) १३७९० (०७-०७-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईच्या समुद्रात सुरु झालेली दोन तरंगती रेस्टॉरंट सध्या डबघाईला आल्याचे माहे एप्रिल, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्सनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करोनामुळे लादलेल्या निर्बंधामुळे बंद असलेली दोन्ही रेस्टॉरंट मुंबईतील सर्व निर्बंध रद्द केल्यानंतरही पर्यटनासाठी खुली न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर रेस्टॉरंटमुळे मनपा, राज्य शासन व केंद्र शासनाच्या महसुलात वाढ होत असून सदरहू रेस्टॉरंट पर्यटनासाठी खुली करण्याची मागणी पर्यटकांकडून होत आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रेस्टॉरंट पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०८-२०२२) :** (१) दक्षिण मुंबईच्या समुद्रात मुंबई बंदर प्राधिकरण यांचे परवानगीने दोन तरंगती रेस्टॉरंट दिनांक ३१/१२/२०१८ पासून सुरु झाली आहेत. मुंबई बंदर विश्वस्त (MBPT) केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. सदर तरंगती रेस्टॉरंट मार्च, २०२० पासून कोविड महामारी मुळे बंद झाली आहेत.
(२) सदर बोटी (तरंगते रेस्टॉरंट) कस्टम विभागाने जप्त केल्या होत्या आणि करोना काळात त्या बंद होत्या. या आदेशा विरोधात परवानाधारकांनी ट्रिब्युनल कडे अपील केले आहे. सदर अपील मान्य झाले असून परवानाधारक ट्रिब्युनल च्याा आदेशाची वाट पहात आहेत. ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित येते.
(३) व (४) येत्या हंगामापासून म्हणजेच ऑक्टोबर, २०२२ पासून हि तरंगती रेस्टॉरंट सुरु करण्याचा प्रयत्न परवानाधारक करणार आहेत, असे मुंबई बंदर प्राधिकरण यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उप मुख्यकर्जाचे प्रश्न कायमच प्रलंबित असल्याबाबत

**(१३) १३९२० (२३-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिनांक १० एप्रिल, २०१७ च्या निर्णयानुसार पोलिसांना खाजगी बॅंकामार्फत उप मुख्यकर्ज देण्याची व्यवस्था पोलीस उप मुख्यव कल्याण महामंडळामार्फत करण्यात आली होती काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अंतर्गत ५ हजार १७ पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना माहे मे, २०१९ पर्यंत ९१५ कोटी ४१ लक्ष रुपये गृहकर्ज वितरित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी मंत्री मंडळाच्या बैठकीत बँकाकडून कर्ज व्यवस्था होत नसल्याने ही योजना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पोलिसांनाही घरबांधणी अग्रीम देण्याचा निर्णय घेतला गेला होता, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सध्या ३ हजार ७०७ पोलिसांनी गृहकर्जाची मागणी केली असून नवीन अर्ज सुध्दा प्रतिक्षेत असून याकरीता पोलीस महासंचालक कार्यालयाने गृहसचिवाकडे मागणी केलेली असूनसुध्दा अदयापही निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने मंत्रीमंडळात निर्णय होवूनही दोन महिन्यापासून अमंलबजावनी न झाल्याने पोलीस विभागात अधिकारी व कर्मचारीमध्ये असंतोष निर्माण होत असल्यामुळे तातडीने शासन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्य पोलीस उप मुख्यव कल्याण महामंडळाने शासन निर्णय उप मुख्यविभाग क्र. बीयुडी०११७/प्र.क्र.२/आस्था-१, दिनांक १०/०४/२०१७ अन्वये, पोलीसांसाठी घर बांधणी अग्रिमाकरीता बँकाकडून कर्ज घेऊन कर्मचाऱ्यांना वितरित करण्यास परवानगी देण्यात आली होती.
(२) होय.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालयाचे ४७१२ व पोलीस बृहन्मुंबई कार्यालयाचे ३०५, असे एकूण ५०१७ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेमार्फत घरबांधणी अग्रिम वितरित केले आहे.
(३), (४) व (५) राज्यमंत्रीमंडळाच्या दिनांक २८/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक १०/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आलेली योजना खंडित करून राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना पूर्वीप्रमाणे शासकीय घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत अग्रिम देण्यासंदर्भात दिनांक ०७/०६/२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सबब दिनांक ०७/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना पूर्वीप्रमाणे शासकीय घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत अग्रिम देण्यास्तव रुपये ७३३,५४,७२,१७४/- (रुपये सातशे तेहतीस कोटी चौपन्न लक्ष बहात्तर हजार एकशे चौऱ्याहत्तर फक्त) विधानमंडळाच्या २०२२ च्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

## सुधागड (ता.पाली, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक योजनेंतर्गत परतावा न मिळाल्याबाबत

**(१४) १३९८५ (२३-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (ता.पाली, जि.रायगड) येथे राज्य शासनाच्या कृषी खात्यामार्फत खरीप हंगाम पंतप्रधान विमा योजना सन २०१६-२०१७ या दरम्यान राबविली जात असून चार वर्षे उलटूनही हे शेतकरी विमा परताव्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधागड तालुक्यात शेतकऱ्यांनी या विमा योजनेचे फॉर्म भरून प्रतिगुंठा १० रूपये प्रमाणे खाते असणाऱ्या बँकेत डीडीद्वारे पैसे भरून हे फॉर्म सात-बारा ८(अ) पासबुकसह कृषी खात्यात जमा केले असून शेतकऱ्यांच्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करून फॉर्म या खात्यामार्फत विमा कंपनीकडे पाठविण्यात आले होते, परंतु दोन वर्षे उलटूनही नुकसान भरपाईचे पैसे मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे सन २०१६-२०१७ मधील खरीप हंगाम पंतप्रधान विमा योजनेचे पैसे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये भात पिकाकरीता सुधागड तालुक्यातील २८ शेतकरी अर्जदारांची नुकसान भरपाई रक्कम रुपये २,८१,४४३/- दिनांक ११/०८/२०२१ पर्यंत लाभार्थ्यांच्या खाती जमा झालेली नव्हती. तथापि, सदर रक्कम माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२१ मध्ये संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(३) प्रधानमंत्री पीक विमा सन २०१६-१७ मध्ये सुधागड तालुक्यातील २८ शेतकऱ्यांना भात पिकाच्या विमा भरपाईची रक्कम रुपये २,८१,४४३/- भारतीय कृषी विमा कंपनी लि. मुंबई यांचेकडून मंजूर झाली होती. सदरचा विमा स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा - पाली यांचेमार्फत काढण्यात आला होता.

सदरची मंजूर रक्कम दिनांक ११/०८/२०२१ पर्यंत लाभार्थ्यांच्या खाती जमा झालेली नव्हती. याबाबत स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा - पाली यांचेकडे वारंवार चौकशी व लेखी पत्र देऊन माहिती मागविण्यात आली असता, भारतीय कृषी विमा कंपनीने सदरची मंजूर रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा - पाली येथे वर्ग करण्याऐवजी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा - नेबरगाव, जि.औरंगाबाद येथे नजरचुकीने पाठविण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. याअनुषंगाने पाठपुरावा केला असता, सदर रक्कम ऑगस्ट व सप्टेंबर, २०२१ मध्ये संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील पुलखल ग्रामपंचायतीने येथे ठरावा विनाच रेतीघाटांचे लिलाव केल्याबाबत

**(१५) १३९८६ (२३-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना त्यांच्या पारंपारिक हद्दीतील गौण खनिजांच्या व्यवस्थापनाचे आणि वापराचे मालकी हद्द असताना जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी ग्रामसभा पुलखल यांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता रेती घाटाचे लिलाव केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत पुलखल हे गाव भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असून खनिजाचे पूर्वेक्षण लायसन किंवा खाणपट्टा देण्यापूर्वी ग्रामसभेच्या पूर्वशिफारशी अनिवार्य असून त्याकरीता जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी कळवून त्यावर ग्रामसभेचा ठराव घेणे अनिवार्य असताना, मात्र सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता ग्रामसभा पुलखल यांनी रेतीघाट लिलावाकरीता कोणताही ठराव वैधपध्दतीने घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयाने रेतीघाटाचे वातावरणीय बदलाचे परिणामामध्ये समावेश करून दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जन सुनावणी घेवून ऑनलाईन प्रक्रिया राबवून रेतीघाटाची विक्री केली असल्याने जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि कर्मचारी तसेच कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे नोंदविण्यात यावेत अशी मागणी सदर ठरावात केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुलखल गावाच्या निस्तारहक्काची रेतीचे उत्खनन करून साठवणूक केलेली रेती तहसिलदार, गडचिरोली मार्फत जप्त करून गावातील गरजूंना नियमाप्रमाणे नि:शुल्क वाटप करून उर्वरीत रेती लगतच्या गावांना सवलतीच्या दरात विक्री करून रक्कम ग्रामसभेकडे जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजा पुलखल येथील नदी नाले पत्रातील रेती/वाळु घाटाचे लिलाव करणे अति आवश्यक असल्याबाबत ग्रामपंचायत पुलखल याचा दिनांक १७/११/२०२१ रोजी ग्रामपंचायत ठराव केला. सदर ठराव विचारात घेवून सन २०२१-२२ च्या कालावधी करीता गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा खाणकाम आराखडा प्रसिध्द करण्यात आला.

तद्नंतर गडचिरोली जिल्ह्यातील रेतीघाटांची जनसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी दिनांक २४/०१/२०२२ रोजी आयोजीत केलेल्या जनसुनावणी मध्ये सदर रेती/वाळू घाटाच्या अनुषंगाने जनसुनावणी मध्ये कोणतेही आक्षेप/हरकती प्राप्त न झाल्याने सदर घाटाची लिलाव प्रक्रीया पूर्ण करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये ग्रामपंचायत पुलखत अंतर्गत पात्र घरकुल लाभार्थी यांना स्थानिक वैनगंगा नदीवरील पुलखत येथील नदीघाटातुन प्रति लाभार्थी ०५ ब्रास रेती नि:शुल्क पुरवठा करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी कळविले आहे.

---

## पाटेगाव (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील तहसिल कार्यालयात जमा केलेली वाळूची चोरी केल्याबाबत

**(१६) १४०९३ (२३-०६-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटेगाव (ता.पैठण,जि.औरंगाबाद) येथे छापा टाकून जप्त केलेली १५० पैकी फक्त २५ ब्रास वाळू तहसिल कार्यालयात जमा करुन उर्वरित १२५ ब्रास वाळू चोरटयांनी परस्पर गायब केल्याचा प्रकार नुकताच माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १२५ ब्रास वाळू परस्पर गायब करण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, औरगांबाद, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद व उपविभागीय अधिकारी, पैठण-फुलंब्री यांच्या संयुक्त पथकाने दिनांक ३१/०३/२०२२ रोजी मौजे पाटेगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात दिलेल्या भेटीवेळी नदीपात्रात १५० ब्रास वाळू साठा व दोन ट्रक्टर, वायर रोप व यारी मशीन आढळून आले. याबाबत उपविभागीय अधिकारी, पैठण-फुलंब्री यांनी संबंधित तलाठी यांना सदर वाळु साठा व यंत्रसामग्री तहसिल कार्यालयात जमा करण्याबाबत कळविले. परंतु, संबंधित तलाठी यांनी पथकाने जप्त केलेला वाळूसाठ्यापैकी २५ ब्रास वाळु तहसिल पैठण येथे जमा केली. तसेच याप्रकरणी आढळून आलेल्या यंत्रसामग्रीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री यांच्याकडून दंडात्मक कार्यवाही सुरू आहे.

या कसुरीच्या अनुषंगाने संबंधित तलाठी यांची प्रशासकीय बदली करण्यात येवून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

---

## चंद्रपूर जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत विहिरीचे बेकायदेशीर खोदकाम केल्याबाबत

**(१७) १४०९४ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत करंजी (ता.गोंडपिपरी) येथे नविन पाणीपुरवठा योजनेच्या कामात कंत्राटदाराने पाटबंधारे विभागाची परवानगी न घेता तलावात बेकायदेशीर विहिरीचे खोदकाम केल्याचे दिनांक २०/०५/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अवैधरित्या विहीर बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२०-०९-२०२२) :** (१) व (२) ग्रामपंचायत करंजी, ता.गोंडपिपरी यांचे ठराव क्र.७/२, दिनांक ३१/१२/२०२१ अन्वये तलावातील विहिरीच्या खोदकामाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले होते. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी पाटबंधारे विभाग यांना परवानगी करीता दिनांक २५/०५/२०२२ रोजी पत्र सादर करण्यात आले. त्यानुसार उप विभागीय अभियंता, पाटबंधारे, शाखा अभियंता व कंत्राटदार यांची संयुक्त पाहणी करुन मौका पंचनामा घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित विभागाची ना-हरकत घेण्यात आली आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत सहाय्यक भूवैज्ञानिक यांनी सूचविल्यानुसार योजनेचा स्त्रोत विहीर खोदकाम करण्यात आले व सदर काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामे करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खाजगी खारभूमी योजनांचा शासकीय योजनेत समावेश करण्याबाबत

**(१८) १५०१० (०४-०७-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खारभूमी योजनांची देखभाल शासनाच्या नाबार्ड योजनेंतर्गत करण्यात येत असून अलिबाग तालुक्यातील सांबरी खारभूमी योजना, मोठापाडा शहापूर खारभूमी योजना, राजणखार मांडवखार खारभूमी योजना, रामराज खारभूमी योजना, हाशिवरे खारभूमी योजना, चरी गोपचरी खारभूमी योजना, भिलजी बोरघर खारभूमी योजना, खातविरा खारभूमी योजना, वासखार खारभूमी योजना, व बहिरीचापाश गाव संरक्षक बंधारा खारभूमी योजना अशा एकूण ११ खारभूमी योजनांच्या दुरूस्ती व देखभालीकरीता शासनाकडून निधी येत नसल्यामुळे बंधाऱ्याच्या दुरूस्तीची कामे वेळेवर होत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील शेतकऱ्यांच्या भात पिकातील शेतीमध्ये समुद्राचे खारे पाणी शिरून भात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून सदर जमिनी नापीक होत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतजमीन गाळाने भरत असून शेतातील अंतर्गत रस्तेही खराब झालेले असून समुद्राच्या उधाणामुळे पडलेल्या खांडीमुळे पाणी परिसरातील नागरीकांच्या घरात शिरून त्यांच्या मालमत्तेचे नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर ११ खाजगी खारभूमी योजनांवर शासनाने नियंत्रण ठेवून सदर बंधाऱ्यांची देखभाल व दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून सदर योजना तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

तथापि, अलिबाग तालुक्यातील सदर ११ योजना बृहत आराखड्यात नसल्याने शासनाच्या ताब्यात नाहीत. त्यामुळे या खाजगी योजनांवर शासनामार्फत निधी उपलब्ध होत नाही.

(२) सदर योजना शासनाच्या अखत्यारीत नाहीत.
(३) सदर योजना शासनाच्या अखत्यारीत नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील ६४ खाजगी खारभूमी योजना ताब्यात घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महापालिकांच्या जमिनीवर वसलेल्या झोपडीधारकांना त्यांच्या धारण क्षेत्रानुसार वैयक्तिक स्वरुपात जमिनी देण्याबाबत

**(१९) ३३४९६ (०७-०७-२०१७) ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २६७९० ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महापालिकांच्या जमिनीवर वसलेल्या अनधिकृत झोपडपट्टयांवर पात्र झोपडीधारकांना त्यांच्या धारण क्षेत्रानुसार वैयक्तिक स्वरुपात जमिनी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी कधीपासून होणार आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०२२) :** (१) व (२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारण, निर्मुलन व पुनर्विकास) १९७१ मधील तरतूदीनुसार पात्र झोपडपट्टीधारकांना त्यांच्या भोगवटयाखालील जमिनीचा भाडेपट्टा मिळण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, उप मुख्यविभाग, दिनांक १०/०७/२००२ मध्ये शासन निर्णय, उप मुख्यविभाग, दिनांक १६/०७/२०१६ व ०३/०१/२०१७ अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. मात्र सदर तरतुदी मुंबई, ठाणे, पुणे व पिंपरी-चिंचवड या शहराना लागू नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळात होणाऱ्या कामांच्या देयकांची खातरजमा करण्याबाबत

**(२०) ३७०६६ (०४-०१-२०१८) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळात होणाऱ्या कामांची देयके सादर करताना चाचणी प्रमाणपत्र म्हाडाच्या दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत दिले जाते हे प्रमाणपत्र या विभागानेच दिले आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी या देयकांसमोर सादर केलेल्या दहा टक्के चाचणी प्रमाणपत्रांची तरी खातरजमा करावी असे आदेश मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०२२) :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अहवालानुसार, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत लोकप्रतिनिधींनी सुचविलेली व जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिलेली कामे विविध निधीतून करण्यात येतात. सदर निधीतून करण्यात येणाच्या कामांसाठी लागणात्या साहित्याची चाचणी म्हाडाच्या दक्षता व गुण नियंत्रण विभागाच्या प्रयोगशाळेतून करण्यात येते.

मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी दिनांक ११/०९/२०१७ या पत्रान्वये सदर साहित्याची चाचणी त्याच विभागामार्फत करण्यात आली आहे किंवा कसे यासाठी चाचणी करण्यात आलेल्या संख्येपैकी किमान १० टक्के प्रमाणपत्रांची खातरजमा पुन:श्च करावी याकरीता मंडळातील कार्यकारी अभियंता यांना आदेशित केले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.